**नि. क्र.६८ च्या आदेशावरुन प्रतिवादी क्र.१ तर्फे साक्षीदार क्र. २.**

**मी शपथेवर कथन करतो की,**

**नाव** – विकास रंगराव कांबळे.

**वय** – ४८ वर्ष, **व्यवसाय** – बॉड रायटर,

**राहणार**– पेरणोली, ता. आजरा, जि. कोल्हापूर.

**सरतपास – श्री. ए. एस. फराकटे वकील.**

**१.** मला आज साक्ष देण्यासाठी न्यायालयाचे समन्स मिळाले आहे. मी एस. टी. स्टँडजवळ दस्तलेखनाचे काम करतो. मला आज साक्ष देण्यासाठी बोलावलेल्या दाव्यातील पक्षकार २०११ साली माझ्याकडे खरेदीचा दस्त लिहिण्यासाठी आले होते. तो दस्त केसरकर आजीने तिच्या नातवाला करुन दिला होता. त्यांच्यासोबत दोन साक्षीदार व दोन ओळखदार आले होते. त्यांनी दस्त लिहिण्यासाठी माझ्याकडे मिळकतीचा ७/१२ उतारा व त्यांची आधारकार्ड ओळखपत्रे दिली होती. मी केसरकर आजीने सांगितल्या प्रमाणे तो दस्त टंकलिखित केला होता. त्यावरती माझी लेखनिक म्हणून स्वाक्षरी आहे. मला तो दस्त दाखविल्यास मी ओळखू शकतो. आता मला तो दस्त दाखवला, त्यातील मजकूर बरोबर असून मी त्यावरील दस्तूर म्हणून माझी आणि इतरांच्या स्वाक्ष–या ओळखतो. त्याला नि. क्र.५६ देण्यात आलेला आहे.

**सरतपास पुर्ण.**

**वादी तर्फे उलटतपास – श्री. आर. आय. पालकर वकील.**

**२.** माझे बी. कॉम च्या दुस–या वर्षापर्यंतचे शिक्षण झाले आहे. मला ते केव्हा पुर्ण झाले याबाबत आठवत नाही. माझ्याकडे दस्तलेखनाचा परवाना नाही. माझ्याकडे मी लिखाण केलेल्या दस्तांच्या नोंदी घेतल्याचे रजिस्टर नाही. मला दस्त लेखना बाबतचे कायदेशीर ज्ञान आहे. मी मागील ३५ वर्षांपासून दस्त लेखनाचा व्यवसाय करत आहे. मी यापुर्वी न्यायालयात साक्ष दिलेली आहे. प्रतिवादी क्र.१ माझ्या ओळखीचा आहे. माझी त्याच्यासोबत नि. क्र.५६ चा दस्त करतेवेळी ओळख झाली होती.

**३.** सदर दस्त करण्यापुर्वी प्रतिवादी क्र.१ हा एकवेळ माझ्याकडे आला होता. सदर दस्त झाल्यानंतर प्रतिवादी क्र.१ माझ्याकडे एकदाही आलेला नाही. मला न्यायालयाचे साक्षीसमन्स मिळाले त्यावेळी माझ्याकडे दस्त नव्हता. मी दस्त करुन

दिल्यानंतर आज दाखवेपर्यंत दरम्यानच्या काळात पाहिलेला नाही. आज साक्ष देण्यापूर्वी माझी, प्रतिवादी क्र.१ अथवा त्याच्या विधिज्ञांची भेट झालेली नाही.

४. माझे सध्या मागील तीन वर्षांपासून बसस्थानकाच्या आवारात भाडयाने घेतलेले कार्यालय आहे. मी पुर्वी जुन्या तहसिल कार्यालया समोरील चव्हाणांच्या इमारतीमध्ये भाडयाच्या कार्यालयात दस्तलेखनाचे काम करत होतो. माझे संगणकावरती टंकलेखन करण्याचे प्रशिक्षण झालेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, नि. क्र.५६ चा दस्त मी स्वतः टंकलिखित केलेला नाही. दस्त लिहिण्याच्या वेळी केसरकर आजीचे वय ६० ते ६५ वर्षांच्या आसपास होते. मी दस्त लिहिण्यापूर्वी मिळकती बाबत चौकशी केली होती. मी केसरकर आजीला ७/१२ उता–यावरील जमीन त्यांचीच आहे काय याबाबत विचारले होते. मी तिच्याकडे तिच्या मुला–मुलीं बाबत विचारले होते. तीने तिला मुले–मुली असल्याचे सांगितले होते. मला तीने तिला किती मुले व मुली आहेत याबाबत सांगितलेले आता आठवत नाही. मी केसरकर आजीला दस्तासाठी तिच्या मुला–मुलींच्या संमतीची आवश्यकता असल्यामुळे त्यांना बोलावून घ्यायला सांगितले होते. त्यावेळी केसरकर आजीने माझ्या नावावर जमीन असल्यामुळे मी प्रतिवादी क्र.१ ला देणार असे सांगितल्यामुळे मी दस्त तयार केला होता.

५. केसरकर आजी दस्त केल्याच्या दिवशी एकदाच माझ्या जुन्या कार्यालयात आली होती. त्या साधारणतः एक तास माझ्या कार्यालयात थांबल्या होत्या. मी त्या दिवशी नि. क्र.५६ चा एकच दस्त केला होता. मला तो दस्त त्या दिवशी किती वाजेच्या दरम्यान नोंदवला याबाबत आता आठवत नाही. त्या दिवशी दस्त लिहिण्यासाठी केसरकर आजी, प्रतिवादी क्र.१, साक्षीदार आणि ओळखदार सोडून इतर कोणीही आले नव्हते. माझ्यासमोर केसरकर आजी व प्रतिवादी क्र.१ मध्ये पैसे देण्या–घेण्याचा व्यवहार झाला नव्हता. केसरकर आजी अशिक्षित होती. हे म्हणणे खरे नाही की, केसरकर आजीने सांगितल्या प्रमाणे दस्त लिहिलेला नाही असे घडलेले नाही.

६. मी माझ्या व्यवसायाकरीता ३० वर्षांपूर्वी संगणक घेतलेला आहे. माझ्याकडे

संगणकामध्ये खरेदीपत्राच्या दस्ताचे नमुने जतन केलेले आहेत. मी पक्षकार दस्ताबाबत माहिती देऊन गेल्यानंतर त्याबाबतचा बराचसा मजकूर पुर्वी तयार करुन ठेवतो. मी नि. क्र.५६ चा दस्त केसरकर आजी व प्रतिवादी क्र.१ येण्यापूर्वी संगणकावरती तयार करुन ठेवला होता. दस्तावरील ओळखदार पुर्वीपासून माझ्या परिचयाचे नव्हते. मी आजही पेरणोली गावात राहतो. मी गावावरुन येऊन–जाऊन व्यवसाय करतो. मी सकाळी ०८.०० वाजता येऊन रात्री ०७.०० वाजता गावी जातो.

**७**. मला नि. क्र.५६ चा दस्त किती वाजता नोंदवला गेला याची माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदर दस्तापासून माझे व प्रतिवादी क्र.१ चे मैत्रीचे संबंध झालेले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.१ ने त्याच्या ओळखीच्या लोकांना माझ्याकडे दस्त करण्यासाठी पाठवले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटा दस्त तयार केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रतिवादी क्र.१ ला मदत करण्यासाठी आज खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृती,**

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

(आर. पी. थोरे)

दिनांक – १६.०३.२०२६.

आजरा.

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, आजरा.

**नि. क्र.६९ च्या आदेशावरुन प्रतिवादी क्र.१ तर्फे साक्षीदार क्र. ३.**

**मी शपथेवर कथन करतो की,**

**नाव** – मधुकर गोपाळ यलगार.

**वय** – ६४ वर्ष, **व्यवसाय** – शेती,

**राहणार**– शिरसंगी, ता. आजरा, जि. कोल्हापूर.

**सरतपास – श्री. ए. एस. फराकटे वकील.**

१. मला आज साक्ष देण्यासाठी न्यायालयाचे समन्स मिळाले आहे. मला सन २०११ मध्ये येसूबाई केसरकरने तिच्या जमिनीची प्रतिवादी क्र.१ ला खरेदी देण्याकरीता साक्ष घालण्यासाठी बोलावले होते. त्यावेळी मी, मसणू सुतार, येसूबाई केसरकर आणि प्रतिवादी क्र.१ विकास कांबळे याच्याकडे गेलो होतो. विकास कांबळेला येसूबाईने तिच्या जमिनीची खरेदी द्यायची आहे असे सांगितले होते. त्याप्रमाणे विकास कांबळेने लिहिलेल्या स्टँपवरती आम्ही साक्षीदार म्हणून सहया केल्या होत्या. त्यावेळी येसूबाईला दुय्यम निबंधक कार्यालयात प्रतिवादी क्र.१ ने पैसे दिले होते. विकास कांबळेने दस्त तयार केल्यानंतर येसूबाई समोर आम्हाला वाचून दाखवला होता. तो दस्त वाचून दाखविल्यानंतर येसूबाईने बरोबर आहे असे सांगितले होते. मला तो दस्त दाखविल्यास मी ओळखू शकतो. आता मला तो दस्त दाखवला, त्यावरती येसूबाईचा निशाणी अंगठा, माझी व मसणू सुतारची साक्षीदार म्हणून स्वाक्षरी असून विकास कांबळेची दस्त लिहिल्याबाबत स्वाक्षरी आहे. त्याला नि. क्र.५६ देण्यात आलेला आहे.

**सरतपास पुर्ण.**

**वादी तर्फे उलटतपास – श्री. आर. आय. पालकर वकील.**

२. माझे सातवी पर्यंतचे शिक्षण झाले आहे. मी गावाच्या राजकारणात सहभाग घेतो. मी व मसणू सुतार राजकारणाच्या माध्यमातून पुर्वीपासून एकमेकांना ओळखत होतो. मला मसणू सुतार याने बोलावले नव्हते. येसूबाईने दस्त केल्याच्या आदल्या दिवशी मला शिरसंगी येथे माझ्या घरी येऊन साक्षीसाठी यायला सांगितले होते. ती १२.३० वाजेच्या दरम्यान येऊन ०१.०० वाजेच्या दरम्यान परत गेली होती. तिच्यासोबत कोणीही आले नव्हते.

**३.** शिरसंगी ते किणे अंतर साधारणपणे १ कि. मी. चे आहे. तीने तिच्या नातवाला जमीन खरेदी करुन द्यायची असल्यामुळे मला साक्ष द्यायला बोलावले होते. मला त्या दिवशी येसूबाईने तिला कोणत्या जमिनीची विक्री करायची आहे याबाबत सांगितले नव्हते. आमची गावे शेजारी असल्यामुळे आमच्यात ओळख होती. येसूबाई माझी नातेवाईक नसून आमच्या जमिनी एकमेकांलगत नाहीत. माझी व येसूबाईची दस्त केल्यापुर्वी एक– दोन वर्षांपुर्वीपासून येण्या–जाण्यावरुन ओळख होती. मला येसूबाईच्या परिवाराबाबत माहिती होती. मला तिचा पती कधी वारला याची माहिती नाही. येसूबाईला दोन मुली असल्याची मला माहिती आहे. मला त्या मुलींच्या लग्ना बाबतची ऐकीव माहिती आहे. मला त्या मुली येसूबाईकडे येत–जात होत्या काय याबाबत माहिती नाही. मला येसूबाई व तिच्या मुलींमध्ये तिच्या जमिनीच्या वाटण्या झाल्याची माहिती नाही. येसूबाईला मुलगा वारस नव्हता.

**४.** माझी येसूबाईच्या मुलींशी ओळख नाही. माझी प्रतिवादी क्र.१ सोबत नि. क्र.५६ चा दस्त होण्यापूर्वी पासून राजकारणामुळे ओळख आहे. मी नि. क्र.५६ चा दस्त करण्यासाठी आजरा येथे दुपारी १२.०० वाजता येऊन ०२.०० वाजता निघून गेलो होतो. माझ्याअगोदर येसूबाई, प्रतिवादी क्र.१ व मसणू सुतार आज–यात आलेले होते. मी विकास कांबळेच्या कार्यालयात गेलो होतो. मी पोहोचलो तेव्हा दस्त थोडाफार लिहिणे बाकी राहिले होते. तो दस्त विकास कांबळे काळया शाईच्या पेनाने लिहित होता. तो दस्त साधारणतः सात ते आठ पानांचा होता. माझ्यासमोर येसूबाई व प्रतिवादी क्र.१ मध्ये पैसे देण्या–घेण्याचा व्यवहार झाला होता. प्रतिवादी क्र.१ ने येसूबाईला २,८०,०००/– रुपये दिले होते. मला ती रक्कम कोणत्या नोटांमध्ये व त्याची किती बंडले होती याबाबत आठवत नाही. मी स्वतः ती रक्कम मोजली नव्हती. येसूबाईने सर्व रक्कम मोजून घेतली नव्हती, तीने केवळ नोटांचे बंडल मोजले होते. त्यावेळी बरेच लोक असल्यामुळे मला येसूबाई सोबत तिचा कोणी नातेवाईक आला होता काय याबाबत आठवत नाही. येसूबाईने पुढे ती रक्कम कोठे ठेवली व कशी नेली याबाबत मला माहिती नाही.

**५.** मी पैसे देण्याअगोदर नि. क्र.५६ वरती स्वाक्षरी केली होती. मी स्वाक्षरी

केल्यानंतर निघून गेलो होतो. मला त्यानंतर येसूबाई पैसे व दस्त घेऊन कोठे गेली होती याबाबत माहिती नाही. माझी सदर दस्तानंतर येसूबाई सोबत भेट झाली नव्हती. तसेच मी तिच्या घरीही गेलो नव्हतो. दस्त करतेवेळी येसूबाईचे वय साधारणपणे ७५ ते ७८ वर्षे असल्याचे वाटत होते. त्यावेळी येसूबाईचे वय झालेले असल्यामुळे तिला एकटीला आज–याला येणे शक्य नव्हते. मला येसूबाईला आज–याला कोण घेऊन आले होते याची माहिती नाही. मला दस्तानंतर येसूबाई किती दिवसांनी वारली याबाबत सांगता येणार नाही.

**६**.   नि. क्र.५६ चा दस्त झाल्यानंतर माझी व प्रतिवादी क्र.१ ची भेट झाली नव्हती. मला न्यायालयाची नोटीस आल्यानंतर आमची भेट झाली होती. प्रतिवादी क्र.१ ने मला फोन करुन नोटीस आल्याबाबत विचारले होते. मला प्रतिवादी क्र.१ ने दस्त दाखवला नव्हता. मी आज प्रतिवादी क्र.१ सोबत न्यायालयात आलेलो नाही. मला प्रतिवादी क्र.१ व मसणू सुतार हे एकाच पक्षाचे कार्यकर्ते असल्याची माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही सर्वांनी संगनमत करुन येसूबाईची फसवणूक केली असून आज खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृती,**

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

दिनांक – १६.०३.२०२६.                    (आर. पी. थोरे)

आजरा.                    प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, आजरा.